# 'व्हीव्हीआयपी' येती घरा । जाई शांती देशांतरा ॥

## 'व्हीव्हीआयपीं'चा आग्रह कशासाठी?

- परदेशी पाहुण्यांची जागा देशातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींनी घेतली
- 'व्हीव्हीआयपीं'ना कार्यक्रमासाठी आमंत्रित करणे जिकिरीचे
- शिक्षण-संशोधन संस्थांपुढे आदर्श हवेत ते शिक्षकांचे, संशोधकांचे!

चिं. वि. जोशी यांचे विनोदी वाङ्मय मी लहानपणापासून आवडीने वाचत आलोय. त्यांच्या 'चौथे चिमणराव' या पुस्तकात 'टिटो आणि भटो' या गोष्टीत चिमणरावाच्या भारतयात्रेच्या उडालेल्या दैनेचे वर्णन आहे. कारण? कारण त्या वेळी युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो हे भारतयात्रेवर होते. त्यांच्या खास ट्रेनच्या सुरळीत प्रवासासाठी चिमणरावासारख्या सामान्य भारतीयाने आखलेल्या प्रवासात नाना विघ्ने कशी आली, हे सांगून शेवटी हिंदी सिनेमातील अशोककुमारच्या तोंडच्या गाण्याच्या ओळी दिल्या आहेत : 'भारत में चलती है परदेसीयोंकी, कम्बख्ती है भारतीयों की.'

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या दहा-बारा वर्षांत नवोदित भारताच्या राज्यकर्त्यांची एक स्वाभाविक अपेक्षा होती, की आपल्या देशाचे कौतुक बाहेरच्यांनी करावे. म्हणून विविध देशांतून महत्त्वाच्या व्यक्तींना आमंत्रित करून त्यांना भारतदर्शन घडवण्यात आले. परदेशीयांनी विशेषकरून प्रगत मानल्या जाणाऱ्या देशातल्या लोकांनी आपली पाठ थोपटली, तर आपला न्यूनगंड सुखावला जायचा. आज परिस्थिती वेगळी आहे. आता देशात आत्मनिर्भरतेचे व आत्मविश्वासाचे वारे वाहू लागल्याने परदेशी पाहुण्यांना तेवढे महत्त्व राहिले नाही; पण त्यांची जागा घेण्यासाठी आता देशीच पण अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची संख्या वाढते आहे. माझ्याकडे १९६८ चा शासन व्यवहार कोश आहे. त्यात 'व्ही.आय.पी.'चे मराठी भाषांतर विशेष मान्यवर व्यक्ती (वि.मा.व्य.) असे आहे; पण 'व्ही.व्ही.आय.पी.' हा शब्द नाही तेव्हा कालांतराने 'व्हीआयपी'चे अवमूल्यन झाल्याने 'व्हीव्हीआयपी' अस्तित्वात आला असावा. गेल्या चाळीस वर्षांत सुरक्षा कवच हाही एखाद्या व्यक्तीचा मान्यवरतेचा मापदंड झाला आहे. 'त्याला मिळाले तसले सुरक्षाकवच मला का नाही,' यावर झालेला रुसवा-फुगवा कधी कधी वृत्तपत्रात वाचायला मिळतो.

अनेक संस्था अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना विशेष प्रसंग साजरे करताना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावतात. राष्ट्रपती, पंतप्रधान आदींचे पाय त्या निमित्ताने संस्थेच्या आवाराला लागले तर त्या प्रसंगाचा दर्जा उंचावतो. प्रसिद्धिमाध्यमांत समारंभाबद्दल पुष्कळ काही माहिती दृक्-श्राव्य-वाचनीय स्वरूपात येते. त्यातून संस्थेवर आणि आयोजकांवर प्रसिद्धीचा प्रकाशझोत येतो. याव्यतिरिक्त आणखी एक फायदा अतिमहत्त्वाच्या पाहुण्यांकडून अप्रत्यक्षरीत्या व्हायचा. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना त्यांची भेट कुलाबा-नेव्हीनगर मुंबई येथे होणार होती. तत्पूर्वी त्या विभागातले रस्ते झटपट सुधारण्यात आले. त्या अखेर सरळ हेलिकॉप्टरने आल्यामुळे त्यांना रस्त्यांची सुधारित आवृत्ती पाहायला मिळाली नाही. पण त्यांचा फायदा त्या भागातल्या नागरिकांना मिळाला, हे काय कमी होते? मात्र हल्लीचे रस्ता-प्रशासन 'व्हीव्हीआयपीं'च्या भेटींना बळी पडत नाही, अन्यथा पुण्याच्या रस्त्यांवरचे खड्डे टिकून राहिले नसते.



'व्हीव्हीआयपी' म्हटले की अशी सुरक्षा आलीच.

उलट 'व्हीव्हीआयपी' येणार असले, की पोलिस आयुक्त किंवा तत्सम उच्च पदाधिकाऱ्यांचा फतवा निघतो. त्यात अमुक रस्ते, अमुक वेळापत्रकाप्रमाणे मान्यवरांकरिता राखून ठेवण्याची सूचना असते. अशा वेळी जनतेने कुठले द्राविडी प्राणायाम करायचे, त्याहीही माहिती असते. अशा वेळी शहाण्या माणसाने घराबाहेर पडू नये. नाही तर त्याला तसाच अनुभव येईल-जसा चिमणरावाला टिटो भेटीत आला होता. आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे कार्यक्रमाचे वेळापत्रक ठरल्याबरहुकूम चालेलच, असेही गृहीत धरू नये.



**जयंत नारळीकर**

मी काही महिन्यांपूर्वी दिल्लीत शास्त्रज्ञांच्या एका मेळाव्यासाठी गेलो होतो. तेथे माननीय राष्ट्रपती प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते. राष्ट्रपती म्हणून कलामसाहेबांचा मान आहे. त्याशिवाय व्यक्ती म्हणून मला त्यांच्याबद्दल आदर आहे. त्यांचे भाषण उत्तम आणि प्रसंगानुरूप झाले; पण त्यांच्या तासाभराच्या भेटीसाठी आयोजकांना काय काय पावले उचलावी लागली, ते पाहू या.

प्रथम, त्यांची सुरक्षा पाहणाऱ्यांनी ते या कार्यक्रमाचे भाषण करण्यासाठी ज्या संस्थेत येणार होते त्या संस्थेचे आवार तीन दिवस आधीपासून ताब्यात घेतले. त्या संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ते तीन दिवस सक्तीची सुट्टी. कारण त्यांना आवारात यायची परवानगी नाही. कार्यक्रमाला निमंत्रित व्यक्तींनी निमंत्रणपत्र बरोबर आणणे आवश्यक होते. शिवाय त्यांनी बरोबर पिशवी किंवा इतर सामान आणायचे नाही. त्यामुळे ज्या परिषदेकरता हे शास्त्रज्ञ येणार होते, तिची कागदपत्रे बरोबर आणण्याची परवानगी नव्हती आणि नियोजित वेळेच्या कमीत कमी अर्धा तास आपल्या जागी स्थानापन्न होणे आवश्यक होते; पण प्रत्यक्ष समारंभाच्या दिवसापूर्वीच आयोजकांची डोकेदुखी सुरू होते. आधी समारंभाची तारीख प्रमुख पाहुण्यांची सोय पाहून ठरवावी लागते.. निमंत्रक संस्थेच्या इतिहासात अमुक एक खास दिवस असू शकतो, ज्या तारखेला कार्यक्रम करणे योग्य झाले असते. ती तारीख मान्यवर पाहुण्यांना मान्य होईलच असे नाही. कारण त्यांचे वेळापत्रक भरगच्च भरलेले असू शकते. पण ही सर्व पथ्ये पाळूनसुद्धा ठरलेल्या दिवशी कार्यक्रम होईलच असे नाही. राजकीय क्षेत्रात घडामोडी वेगाने घडू शकतात, त्या अनपेक्षित असू शकतात, त्यासाठी निमंत्रित पाहुण्यांना अचानक देशातल्या वेगळ्याच भागात उपस्थित राहणे अनिवार्य असते. त्यामुळे सर्व पूर्वतयारीनंतर अगदी हारतुरे घेण्यापर्यंत पोचलेला कार्यक्रमही रद्द करावा लागतो. एका प्रसिद्ध विज्ञान संस्थेने सुवर्णमहोत्सवासाठी राष्ट्रपतींना बोलावले होते. आयत्या वेळी राष्ट्रपती येऊ न शकल्याने तारीख दोनदा बदलावी लागली आणि शेवटी संस्थेला राष्ट्रपतींऐवजी राज्यपालांवर समाधान मानावे लागले.

ही परिस्थिती लक्षात घेता, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना कार्यक्रमासाठी आमंत्रित करणे किती जिकिरीचे असू शकते, ते पाहून निदान शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातल्या संस्थांनी विचार करायला पाहिजे, की ही जोखीम स्वीकारायची का? संस्थेचे नाव, कीर्ती तिच्या कार्यातून होते; कुठल्या मोठ्या व्यक्तीच्या उद्घाटनामुळे नाही. पण ज्या व्यक्तीला आपण या महत्त्वाच्या कामासाठी बोलावतो ती जर 'व्हीव्हीआयपी' सदरात बसत असेल, तर आपण एक प्रश्न स्वतःला विचारून पाहावा : ही व्यक्ती आज ज्या पदावर असल्यामुळे 'व्हीव्हीआयपी' झाली, ती जर त्या पदावर नसती तर तिला आपण या कामासाठी आमंत्रित केले असते का? जर उत्तर होकारार्थी असेल तर पुढे जावे. काही लक्षणीय अपवाद सोडल्यास माझ्या लेखी बहुतेक 'व्हीव्हीआयपीं'बद्दल नकारार्थी उत्तर मिळते; पण बऱ्याच आयोजकांना या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना आमंत्रित करायचा मोह आवरत नाही. कारण त्यांच्या आगमनाने (जेव्हा केव्हा ते घडून येई तेव्हा) आयोजकांनाही काही काळ प्रसिद्धीच्या झोतात वावरायला मिळते.

पुण्यातील 'आयुका'च्या इमारतींना राष्ट्राला समर्पित करताना १९९२ मध्ये कोणाला बोलवावे, यावर 'विचारमंथन करताना अनेकांनी राष्ट्रपती किंवा पंतप्रधानांचे नाव सुचवले; पण आम्ही निवडले नोबेल पारितोषिकविजेते, जन्माने भारतीय प्रा. सुब्रह्मण्यम चंद्रशेखर यांना. आज शिक्षण-संशोधन संस्थांपुढे आदर्श हवेत ते शिक्षकांचे, संशोधकांचे! राज्यकर्त्यांचे नाही.

**(लेखक ज्येष्ठ शास्त्रज्ञ आहेत.)**

## उद्याच्या अंकात

**पाकिस्तान आणि तुर्कस्तान**

तुर्कस्तानच्या धर्तीवर 'सेक्युलर' देश बनविण्याचा आदर्श पाकिस्तानने सुरवातीपासून ठेवला आहे; पण पाकिस्तानमधील वस्तुस्थिती निराळी आहे... **राजेंद्र अभ्यंकर** यांचा लेख